

वर्ष १० वे  विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27  संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२०  वार-बुधवार दि. १८ जून २०२५ पाने ४ किंमत ३

# नाना, तुम्ही चांगलेच नाव कमविले

## छत्रपतींच्या नावाने पतसंस्था उघडून ठेवीदारांना तुम्ही चांगलेच संतोष केले





Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

# गेवराईत छत्रपती मल्टीस्टेटच्या दारात ठेवीदाराने घेतला गळफास चेअरमन संतोष भंडारी यांच्यावर गुन्हा दाखल

## गेवराईच्या मुख्य शाखेत घडली घटना, नागरीकांत संताप

**गेवराई, (दिव्य न्युज):- येथील छत्रपती मल्टीस्टेटमध्ये मुदत ठेवीच्या रुपात ठेवलेली रक्कम मिळत नसल्याने एका ४६ वर्षीय व्यक्तीने शाखेच्या दारातच गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना बुधवारी पहाटे ३ वाजता घडली. याप्रकरणी मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष भंडारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश आसाराम जाधय (वय ४६, रा.खळेगाव ह.मु.गणेश नगर, गेवराई) असे आत्महत्या केलेल्या ठेवीदार व्यक्तीचे नाव आहे.**

दिलेल्या फिर्यादीत कविता सुरेश जाधव (वय ३५) यांनी म्हटले आहे की, मी व माझे पती सुरेश आत्माराम जाधव यांच्यासह राहत असुन शेतीचा व्यवसाय करून पोट भरते. मला एक मुलगी साक्षी (वय २१) व एक मुलगा शुभम (वय १८) असे दोन मुले असून ते दोघेही शिक्षण घेत आहेत. आम्ही आमच्या शेती व्यवसायाच्या बचतीतून मुलांच्या शिक्षणासाठी सन २०२० पासून एकुण ११ लाख ५० हजार मुदत ठेव हि छत्रपती मल्टीस्टेटच्या गेवराई शाखेत ठेवलेले होते. मात्र मागील दोन वर्षांपासून आम्ही त्यांना वारंवार आमचे ठेव ठेवलेले पैसे परत द्या असे म्हणत होतो. परंतु ते आम्हाला पैसे परत देत नवहते. आम्हाला आज देतो, उद्या देतो असे म्हणून टाळाटाळ करीत होते. मागील सहा महीण्यापुर्वी माझे पती सुरेश जाधव यांनी ठेवीचे पैसे परत देत नसल्याने विषारी औषधाची बॉंटल घेऊन जात शाखेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी मात्र छत्रपती मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष उर्फ नाना बसंता भंडारी यांनी आम्हाला आमचे २ लाख ५० हजार रुपये परत दिले होते. उर्वरीत ९ लाख रुपये पुढील दान महिन्यानंतर देतो असे सांगितले होते. परंतु त्यांना आम्ही वारंवार छत्रपती मल्टीस्टेट शाखा गेवराई येथे जावुन देखील पैसे दिले नाही. त्यामुळे माझे पती सुरेश जाधव हे खूप तणावात राहत होते. दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी पैसे नसल्याने ते अधिकच खचून जात मल्टीस्टेटच्या त्रासाला कंटाळून गेले होते.



दि.१७ रोजी दिवसभर छत्रपती मल्टीस्टेट शाखा गेवराई येथे पैसे मागण्यासाठी आम्ही आमच्या दोन्ही मुलांसह गेलो होतो. परंतु शाखेच्या मॅनेजर ज्योती क्षीरसागर यांनी आम्हाला दिवसभर पैसे दिले नाही. तसेच माझे पती सुरेश जाधव यांना अर्वाच्च भाषेत बोलुन शाखेतून बाहेर काढून दिले. यानंतर माझे पती सुरेश जाधव यांना मी फोन करू. मुलांसोबत घरी थांबण्यास सांगितले होते. यानंतर त्यांनी दि.१८ रोजी सकाळी ३ वाजण्याच्या सुमारास छत्रपती मल्टीस्टेटच्या दारासमोरच गळफास लावून आत्महत्या केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मात्र जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, चेअरमन संतोष भंडारी यांना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा घेत नातेवाईकांनी काही वेळ पोलिस ठाण्यात ठिय्या मांडला. यावेळी पोलिसांनी तात्काळ चेअरमन संतोष भंडारी यांच्यावर गुन्हा दाखल केला.माझ्या मुलांच्या शिक्षणाचे तुम्ही वाटोळे केल्याबद्दल धन्यवाद, एवढा अंत एखाद्याचा बघू नये, खरी परिस्थिती जाणून घ्यायला हवी होती. वेळोवेळी पैसे मागवून देखील तुम्ही पैसे देत नाहीत, म्हणून मी तुमच्यासमोर आत्महत्या करत आहे, याचा निरोप चेअरमन संतोष भंडारी व भंडारी दादा यांना द्या, असे आत्महत्या करण्यापूर्वी सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेटच्या शाखा व्यवस्थापक ज्योती क्षीरसागर यांना व्हाट्सएप मेसेज टाकून गळफास घेत जीवन संपवले.

## जादा परताव्याचा लोभ महागात

# ६६ लाखांची झाली फसवणूक

केज , (दिव्य न्युज):- रिअल इस्टेट मध्ये काम करीत असलेल्या कंपनीत गुंतवणूक केल्यास जादा दराने परतावा देण्याचे आमीष दाखवून केज मधील नऊ जणांना ६६लाख ७० हजार रु ची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी अहिल्या नगर येथील ब्रिक्स सोल्युशन कंपनीचे मालक आणि त्यांचा व्यावसायिक भागीदार असल्याचे सांगून फसवणूक करणारा केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील येथील एक यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०२२ मध्ये केज येथील समता नगर केज येथील अजय बबनराव मिसाळ याने त्यांचे गल्लीत राहात असलेला बाळासाहेब सखाराम चौरे (रा. जिवाचीवाडी ता. केज) आणि निलेश काळे याचेकडुन पुणे येथील ब्रिस्क सोल्यूशन, मोशी, जि. पुणे या कंपनीचे मालक प्रशांत राधा कृष्ण होन (रा. कोल्हार ता. राहता जि. अहिल्यानगर) यांची ओळख झाली.

प्रशांत होन व बाळासाहेब चौरे याने अजय मिसाळ यांना सांगितले की, त्यांची ब्रिस्क सोल्यूशन हि कंपनी पुण्यामध्ये रिअल इस्टेटचे काम करते. या कंपनीमध्ये तुम्ही जर गुंतवणूक केली तर एक वर्षा नंतर चांगल्या प्रकारचा परतावा भेटेल. कपंनीने पुण्यामध्ये बांधकाम केलेल्या फ्लॅट पैकी एक वन बी.एच.के. फ्लॅट तुम्हाला भेटेल असे सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून अजय मिसाळ आणि निखील अनिलराव काळे, विश्वजीत नवनाथ बारगजे, हरिभाऊ बहीरे,

▸▸ पान २ वर

## शिंदे गटाचं 'ऑपरेशन लोटस'

# गुणरत्न सदावर्तेंना झटका, एसटी बँकेचे १२ संचालक फोडले

मुंबई , (दिव्य न्युज):- ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांना शह देण्याचा प्रयत्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून होतोय का? असा प्रश्न आता विचारला जात आहे. करण एसटी बँकचे १२ संचालक आज शिवसेनेमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. दरम्यान १८ पैकी १२ संचालक




शिवसेनेच्या गळाला लागल्याचे चर्चेनं शिंदे गटानं ऑपरेशन लोटस

▸▸ पान २ वर

# सोन्याच्या दुकानातून चैनची चोरी करणाऱ्या महिलांची टोळी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; चोरीचा ऐवज जप्त

केज, (दिव्य न्युज):- येथील एका सोन्याच्या दुकानातून चांदीच्या चैनची चोरी करणाऱ्या महिलांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकण्यात यश मिळवले आहे. चार महिलांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीस गेलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १७ जून रोजी कुंदन बालासाहेब जोगदंड (वय २३, रा. कानडी रोड, केज) यांनी केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती की, त्यांच्या 'श्री ज्वेलर्स' नावाच्या दुकानात चार अज्ञात महिला ग्राहक म्हणून आल्या. पायातील चांदीची चैन पाहण्याच्या बहाण्याने त्यांनी दुकानातील अनेक चैन पाहिल्या आणि दुकान

▸▸ पान २ वर



# बीडमध्ये बॅनरवर उपमुख्यमंत्र्यांसह झळकला वाल्मिक कराडचा फोटो

## राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याचे अनाधिकृत बॅनर प्रशासनाने हटवले

बीड , (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री छगन भुजबळ,महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या दिग्गजांसोबतच चक्क संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याचा फोटो असलेले बॅनर बीडमध्ये मंगळवारी झळकले.

राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या समर्थकांनी केलेल्या बॅनरबाजीत हा प्रकार घडला. हे सर्व बॅनर अनधिकृतपणे लावले गेले होते. याची चर्चा सुरु होताच काही तासांत प्रशासनाने हे बॅनर काढले. ७ दिवस हे बॅनर होते हे विशेष. माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हा राष्ट्रवादीच्या कोणत्याही पदावर नाही मात्र त्याचा दरारा जिल्ह्याच्या पक्ष संघटनेत होता.




मुख्य आरोपीचा फोटो पहिल्या ओळीत झळकला.पोलिसांनी वेळीच जरब दाखवली असती, आरोपींची त्याच वेळी धिंड काढली असती तरआज इतर लोकांनी अशा प्रकारे फोटो लावले नसते. ७ दिवस हे फोटो झळकले.जिल्हाधिकारी व एसपींकडे याची तक्रार

▸▸ पान २ वर



# वीज वितरण कंपनीचा नागरीकांच्या जिवाशी खेळ

## मेन लाईनची तार तुटून पडली, परिसरातील नागरीकांच्या जिवाला मोठा धोका





बीड : भक्ती कंट्रक्शन एकनाथ नगर तिसगर कॉलनी येथे अवघ्या दहा फुटावर मोठी लाईन गेलेली आहे त्याचा झोळ खालपर्यंत आलेला आहे.कधीही धोका होण्याची दाट शक्यता आहे.याकडे महावितरणने लक्ष देऊन तारा ओढून घ्याव्यात व धोका टाळावा.



# राहुल गांधींच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतील!

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. लोकशाही प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या अनेक पक्षनिरपेक्ष संघटनांनी आणि व्यक्तींनी त्यांना दुजोरा दिलेला आहे. भाजप नेत्यांनी त्यावर पुनश्च प्रतिहल्ला चढवला आहे. आता चेंडू निवडणूक आयोगाच्या कोर्टात असला, तरी आयोग वरवरची उत्तरे देत आहे.**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीदरम्यानच्या केवळ सहा महिन्यांत महाराष्ट्रातील मतदार यादीत ४० लाख मतदारांची भर कशी पडली? हा राहुल गांधी यांचा मुख्य प्रश्न. (प्रत्यक्षात ४८ लाख मतदार वाढले व ८ लाख कमी झाले.) 'त्यापूर्वीच्या साडेचार वर्षात केवळ ३२ लाख मतदार वाढले असताना पुढच्या सहा महिन्यांत ४० लाख कसे वाढले' असा प्रश्न राहुल विचारतात. यापूर्वी इतके अंतर कधीच पडले नसल्याचे ते पुराव्यानिशी सांगतात. यावर कडी म्हणजे या निवडणुकीत महाराष्ट्रातील एकूण मतदारांची संख्या राज्याच्या अनुमानित प्रौढ लोकसंख्येपेक्षाही जास्त होती. 'मतदानादिवशी संध्याकाळी पाच वाजता घोषित मतदान ५८ टक्के होते. त्यात अभूतपूर्व वाढ होऊन दुसऱ्या दिवशी ते ६६ टक्के कसे झाले?' हा राहुल यांचा पुढचा प्रश्न. लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाला होता त्याच मतदारसंघांत, निकाल उलटवून विजय निश्चित करू शकणाऱ्या १२,००० बूथ्सवरच हा सगळा गडबड घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.राहुल गांधींनी दिलेले पुरावे निर्णायक आणि निर्विवाद नसले तरी गंभीर शंका निर्माण करायला पुरेसे आहेत. निवडणूक आयोगाने डिसेंबर २०२४ मध्ये काँग्रेसला लिहिलेल्या एका पत्रात त्यापैकी काहींची उत्तरेही दिली आहेत. परंतु अडचण अशी की या प्रकरणात निवडणूक आयोगाने शंकांचे निवारण करण्याऐवजी शंका घेणाऱ्यालाच दोष दिला आहे. उत्तरे देण्याऐवजी कायदेशीर औपचारिकतेची ढाल पुढे केली आहे.

उदाहरणार्थ- मतदारसंख्येत वाढ झाल्याच्या मुद्द्यावर आयोग म्हणतो की 'मतदार यादी अद्ययावत करण्याची आपली प्रक्रिया निर्दोष आहे. त्यातील प्रत्येक टप्प्यावर हरकत घेण्याचा सर्व पक्षांना अधिकार होता; पण त्यावेळी तुम्ही तक्रार केली नाही.' समजा हे खरे मानले, यादी दुरुस्त होत असताना विरोधी पक्षांनी निष्काळजीपणा दाखवला असला, तरी स्वतःहून मतदार यादीची पुनर्तपासणी करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी ठरत नाही काय? कार्यपद्धती कागदावर इतकी निर्दोष दिसत असूनही सहा महिन्यांत अठेचाळीस लाखांची भर आणि आठ लाखांची वजावट असे एकूण तब्बल ५६ लाख बदल कसे काय झाले? हे प्रश्न निवडणूक आयोगाला विचारल्यावर उत्तरे भाजप नेत्यांकडून मिळू लागतात; तेव्हा शंकांचे मोहोळ अधिकच दाट होऊ लागते.

निवडणूक प्रक्रियेतील गैरव्यवहाराचा भक्कम पुरावा द्यायचा असेल तर तो द्यायचा कसा; हा खरा प्रश्न आहे. निवडणूक आयोग सर्वच्या सर्व माहिती सार्वजनिक करणे टाळतच आला आहे. राहुल गांधींचे इतर प्रश्न भले चुकीचे मानले तरी 'निवडणूक आयोग माहिती सार्वजनिक का करत नाही?' या त्यांच्या प्रश्नाशी आपल्याला मुळीच असहमत होता येणार नाही. मतदार यादीतील बदलात झालेल्या गोंधळाचा पुरावा द्यायचा तर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील बूथवार यादीची तुलना करण्यासाठी दोन्ही याद्यांची सॉफ्ट कॉपी असणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने अद्ययावत यादी वेबसाइटवर टाकली आहे; पण जुनी यादी मात्र डिलीट केली आहे. एखाद्या बूथवर आयोग म्हणतो तितके मतदान संध्याकाळी पाचनंतर झालेले नाही हे सिद्ध करायचे तर आपल्याला त्या बूथचा व्हिडीओ मिळायला हवा. आयोगाने असा व्हिडीओ द्यायला नकार दिला आहे. ज्या नियमानुसार अशी माहिती मागता येत होती तो नियमच सरकारने आता बदलून टाकला आहे. कोणत्या बूथवर किती मतदान झाले याची नोंद असलेला १७ ८ हा फॉर्म सार्वजनिक करावा, अशी मागणी सगळे विरोधी पक्ष आणि संघटना लोकसभा निवडणुकीपासूनच करत आहेत. पण आयोग याला नकार देत आहे. म्हणजे पाणी कुठेतरी नक्की मुरत असले पाहिजे.

निवडणुकीत पराभूत झालेल्या एखाद्या पक्षाने दोन दशकांपूर्वी असले प्रश्न उपस्थित केले असते तर कुणीच ते गांभीर्याने घेतले नसते. (एकदा ममता बॅनर्जींनी तसे केलेही होते.) त्या काळात निवडणूक आयोगाच्या कडकपणाचा दबदबा होता. सत्ताधारी पक्षाला आयोगाचा धाक वाटे. परंतु गेल्या दहा वर्षात आयोगाने ती प्रतिमा गमावली आहे. आता आयोग एका स्वतंत्र घटनात्मक संस्थेप्रमाणे नव्हे तर एखाद्या सरकारी अधिकाऱ्याप्रमाणे काम करताना दिसतो. निवडणूक आयोगाची नियुक्ती निष्पक्ष पद्धतीने व्हावी असा एक प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने केला होता. परंतु आयोगाची निवड करणाऱ्या समितीत मुख्य न्यायाधीशाऐवजी गृहमंत्र्यांची वर्णी लावून या सरकारने त्यावरून बोळा फिरवला. परिस्थितीत निवडणूक आयोग अम्पायर नव्हे तर स्वतःच एक खेळाडू असल्यासारखा दिसतो. इतर प्रश्न विचारतानाच राहुल गांधींनी निवडप्रक्रियेतील या मूलभूत दोषावरही बोट ठेवले आहे. भारतीय लोकशाहीचे भले इच्छिणारा प्रत्येकजण याबाबतीत त्यांच्याशी सहमतच होईल.



# अलहुदा उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थिनींचे ऑलिम्पियाड राष्ट्रीय परीक्षेत यश

बीड , (दिव्य न्युज):- नूर एज्युकेशनल अँण्ड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल,बीड या शाळेच्या विद्यार्थिनींनी सी.पी.एस ऑलिम्पियाड राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उज्वल यश संपादन करत शाळेचा व शहराचा गौरव वाढविला आहे.

शाळेची इयत्ता दहावीची विद्यार्थीनी सय्यद मेहरीन अंजुम माजेदोद्दीन हिने या परीक्षेच्या पहिल्या फेरीत १०० पैकी ९२ गुण व दुसऱ्या फेरीत ८५ गुण मिळवत एकूण उज्ज्वल यश मिळवले असून, तिला गोल्ड मेडल (सुवर्णपदक) प्रदान करण्यात आले आहे. यासोबतच तिने राष्ट्रीय स्तरावर १४ वा क्रमांक (रँक) मिळवून विशेष कौतुकास पात्र ठरली आहे.याच शाळेतील इयत्ता दहावीची आणखी एक विद्यार्थीनी शेख आयेशा तक्दीस शेख मोइजुद्दीन हिने देखील उल्लेखनीय यश मिळवत पहिल्या फेरीत ८९ गुण व दुसऱ्या फेरीत ८२ गुण मिळवले असून, तिला सिल्वर मेडल (रौप्यपदक) प्राप्त झाले आहे. तिने राष्ट्रीय स्तरावर २४ वा क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक डॉ. सिराज खान 'आरजू', संस्थेचे अध्यक्ष सय्यद शफीक हाशमी, सचिव उबेदुल्लाह खान, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक आणि शाळा समिती सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांमध्येही स्पर्धा परीक्षेबाबत आत्मविश्वास निर्माण झाला असून, शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली आहे.

पान ४ वरून

## जुलै-२०१७ पुर्वीचे

दिलेले आहेत. वास्तविक अल्पसंख्याक संस्थांची सखोल माहिती शासनाने सन २०१५ मध्ये अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थाची/शाळांची संपूर्ण माहीती ऑनलाईन मागविण्यात आलेलेली असून ऑफलाइन माहीती अल्पसंख्याक विकास विभाग व शालेय शिक्षण विभागाकडे उपलब्ध असते . सदरची प्रक्रिया अन्यायकारक आहे या मुळे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था चालका मध्ये तीव्र नाराजगी निर्माण झाली आहे. ही जाचक अट रद्द करून जुलै-२०१७ पूर्वीचे अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र ग्राह्यधरुण सुट देण्यात यावी करिता उपरोक्त शासन निर्णयातून सुट देऊन ही अट रद्द करणे बाबतचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजित दादा पवार साहेब, मा.ना.श्री.दत्तात्रय दादा भरणे साहेब अल्पसंख्याक मंत्री यांना शिफारस करण्यासाठी एक शिष्टमंडळाने असे निवेदन मा.आमदार श्री इद्रीस नायकवडी साहेब सदस्य विधान परिषद यांना . देऊन त्यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय अल्पसंख्याक विभाग चे प्रदेश सरचिटणीस कैसर आझाद शेख , राष्ट्र वादी काँग्रेस (अजित पवार)चे अल्पसंख्याक विभाग प्रदेश कार्याध्यक्ष मूबीन सिद्दीकी, अहेमद अली,हसिन अख्थर बिडकर, अदी नेते उपस्थित होते.

## गोविंद सावंत एमबीबीएस

उत्तीर्ण होऊन तो डॉक्टर बनला आहे तरी सामान्य शेतकरी कुटुंबातील एक मुलगा डॉक्टर झाल्यामुळे त्याचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तरी यावेळी गोविंद बोलताना म्हणाला कि माझ्या यशा मध्ये व मला डॉक्टर बनविण्यामध्ये माझे आई-वडील व गुरुजनांचा मोठा वाटा असून मी भविष्यामध्ये गोरगरीब रुग्णांची वैद्यकीय सेवा निस्वार्थपणे व प्रामाणिकपणे करेल.यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, रामेश्वर सावंत,पत्रकार अँड विनायक जाधव, युवा नेते शिवाजीराव तौर , उद्योजक अनिलराव शेळके, पत्रकार सतीषराव मुजमुले ,पत्रकार शेख एजाज भाई इत्यादी उपस्थित होते.

## कलेक्टरांच्या रडारवर

पालक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त गुन्हे दाखल केले जाणार असून बाल विवाहास जबाबदार असणाऱ्या ग्रामसेवकांवरही कडक कारवाई केली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काल दि. १७ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

दरवर्षीप्रमाणे बीड जिल्ह्यामध्ये ऑगस्ट ते ऑक्टोबर या महिन्यादरम्यान मोठ्या प्रमाणात ऊसतोड मजुर स्थानांतरीत होतात. या ऊसतोड मजुरांच्या आरोग्य विषयक काळजी घेण्यासाठी उपाययोजना केल्या जातात. ऊसतोड कामगारांची माहिती संकलित करण्यासाठी व आरोग्य विषयक उपाययोजना करण्यासाठी तालुका तसेच प्रा. आ. केंद्र स्तरावर समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्हयामध्ये महिलांची गर्भाशय शस्त्रक्रिया करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांची पूर्व पुरवानगी घेणे बंधनकारक आहे. दरम्यान, जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठीही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विशेष मोहिम हाती घेतली आहे. प्रत्येक शाळेमध्ये दर सोमवारी बालविवाह विरोधी प्रतिज्ञा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच बालविवाह विरोधी पथनाट्य, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धाचे आयोजन करून ग्रामस्थांना या माध्यमातून जनजागृती करण्याचेही चोख नियोजन हाती घेतले आहे. तसेच प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांनी ७ वी ते १२ वी पर्यंतच्या मुली शाळेत १५ दिवसांपेक्षा जास्त काळ अनुपस्थित राहिल्यास त्याबाबत माहिती ऑनलाइन अरून त्याचा पाठपुरावा करण्याच्या सुचना केल्या आहेत. ही संपूर्ण जबाबदारी शिक्षण विभागावर असणार आहे. महिला व बाल विकास विभागावरही विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. डीटीएफची बैठक दर तीन महिन्याऐवजी प्रत्येक महिन्यात घ्यावी लागणार आहे. गेल्या वर्षी थांबवलेल्या २४५ बालविवाहच्या प्रकरणातील कुटुंबाचे सामाजिक, आर्थिक, सर्वेक्षण करून बालविवाहच्या कारणाचे विश्लेषण करण्याची जबाबदारीही सोपविण्यात आली आहे. बालविवाह थांबवणारे ग्रामसेवक आणि अंगणवाडी सेविकांना जिल्हास्तरावरून कार्यक्रम घेऊन पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे. मुलीचे बालविवाह थांबवून त्यांनी शिक्षणात प्रगती करून शिक्षण पूर्ण केले असेल तर अशा मुलींना जिल्हास्तरावर बक्षीस देऊन सन्मानित केले जाणार आहे. पंचायत विभागावरही महत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. बालविवाह थांबवलेल्या मुलीचे परत बालविवाह होऊ नयेत म्हणून ग्रामपातळीवर शासकीय कर्मचाऱ्यांना पालक अधिकारी म्हणून नेमणूक करणे, त्याचबरोबर त्यांनी मुलीच्या शिक्षणांची जबाबदारी पाहणे यासंदर्भातही नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक ग्रामसभेमध्ये बालविवाह प्रतिबंध संदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे. गट विकास अधिकाऱ्यांच्या दर पंधरा दिवसाला होणाऱ्या आढावा बैठकीत बालविवाह प्रतिबंध बाबत आढावा घेण्याचेही नियोजन आखण्यात आले आहे.

## वडवणीत रामलिंग

गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन दरवर्षी रामलिंग पतसंस्थेच्या वतीने करण्यात येते. या अनुषंगाने यावर्षीही दिनांक १६ जून २०२५ सोमवार रोजी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहामध्ये इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या व इतर परीक्षेतील वडवणी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे हे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नेते नारायणराव शेळके, व्यंकटेश गार्डी, शाहू विद्यालयाचे प्राचार्य सानप सर, ईश्वर कुरकुटे सर, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे, वैजनाथ डिगे, तसेच व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, व्यवस्थापक दिगांबरराव गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, श्रीमती.सिताबाई रामभाऊ डिगे, सौ.रंजनाताई शिवाजीराव टकले, सौ.शैलजाताई अर्जुनराव भंडारे यांसह पालक, पतसंस्थेचे ग्राहक, सभासद व गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम श्री.चौंडेश्वरी माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पतसंस्थेच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या परीक्षेत नेत्रदिपक कामगिरी करत गुणवंत ठरलेल्या एकूण जवळपास ५० च्यावर गुणवंतांचा रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व शाल, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

पान १ वरून

## सोन्याच्या दुकानातून

मालकाचे लक्ष विचलित करून त्यातील चांदीच्या चैन चोरून नेल्या.

या घटनेवरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक नवनित काँवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सोपवला. तपासादरम्यान १७ जून रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, चोरीतील महिला नगर रोडवरील नगर नाका, बीड येथे बसची वाट पाहत उभ्या आहेत.

सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी त्वरित कारवाई करत सुमन पोपट येडवे (वय ५२), कलावती मोतीराम केंगार (वय ५६), बबिता भाऊराव केंगार (वय ६१) आणि द्वारकाबाई सतीश बोराडे (वय ४०)(सर्व रा. मुर्शदपूर, ता. व जि. बीड) या चार महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे असलेल्या पर्सची तपासणी केली असता, त्यामध्ये चोरीस गेलेल्या चांदीच्या चैन सापडल्या. चौकशीत त्यांनी केज येथील श्री ज्वेलर्समधून त्या चैन चोरी केल्याची कबुली दिली. चोरीचा ऐवज जप्त करून आरोपी महिलांना पुढील तपासासाठी केज पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पो. ह. मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णू सानप, सचिन आंधळे, महिला पोलीस स्वाती मुंडे आणि चालक नितीन वडमारे यांनी केली.

## बीडमध्ये बॅनरवर

गेल्यानंतर हे बॅनर काढले गेले. याला कारणीभूत हेपोलिस प्रशासन आहे. - धनंजय देशमुख, संतोष देशमुखांचे भाऊया बॅनरबाजीबाबत बप्पासाहेब घुगे यांना संपर्क केला असता मी बाहेरगावी आलेलो आहे. प्रतिक्रिया काय द्यायची, आता बोलू शकत नाही असे म्हणून त्यांनी फोन ठेऊन दिला. प्रतिक्रिया देण्यास त्यांनी नकार दिल्याने याबॅनर बाजीबाबत त्यांची भूमिका समजू शकली नाही.

दरम्यान, अटकेत असलेला वाल्मीक कराड याला बीड कारागृहातून इतरत्र हलवावे, फरार कृष्णा आंधळे याला अटक करावी या मागणीसाठी वैजिनाथ सुरवसे यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारपासून उपोषण सुरु केले आहे.बप्पासाहेब घुगे हे राष्ट्रवादीचे बीड जिल्हा सरचिटणीस आहेत. शिवसेनेतून त्यांची हकालपट्टी झाली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांना जिल्हा सरचिटणीस हे पद दिले गेले होते.ते कंत्राटदार व हॉटेल व्यावसायिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा ७ जून रोजी वाढदिवस होता या निमित्ताने त्यांच्यासमर्थकांनी बीड शहरात ही बॅनरबाजी केली होती.मोहिनीराज ग्रुप असे नाव शुभेच्छुक म्हणून आहे.

## ६६ लाखांची

अजहर अश्रफ शेख, भागवत काशीनाथ काळे, अमोल बबनराव मिसाळ, अभय मोहनराव शिंदे, अनंत मिसाळ यांनी वेगवेगळ्या बँकेतून ऑनलाईन पद्धतीने पैसे पाठविले.

त्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये पैसे परत घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी टाळाटाळ केली आणि प्रत्येक वेळी पुढची तारीख सांगत होते. त्यांची चौकशी केली असता ते दोघे कंपनी बंद करून दुबईला गेले असल्याचे समजले तसेच जानेवारी २०२५ मध्ये प्रशांत होन, बाळासाहेब चौरे यांच्या विरुद्ध करमाळा येथे असाच गुन्हा दाखल झाल्याचे माहीत झाले.

## गुणरत्न सदावर्तेंना झटका

राबवत एकप्रकारे गुणरत्न सदावर्तेंना झटका दिल्याचे बोललं जात आहे.

तर दुसरीकडे संचालक फोडाफोडीमुळे शिवसेना आणि भाजपमध्ये वादाची शक्यता ही वर्तवली जात आहे. गुणरत्न सदावर्ते आणि देवेंद्र फडणवीस यांची जवळीकता लक्षात घेता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणी आता नेमकं काय होतं हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे,

ॲड. गुणरत्न सदावर्ते आणि त्यांच्या पत्नी जयश्री पाटील यांना सहकार खात्यानं मोठा दणका दिला असून एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदावरून दोघांचीही गच्छंती करण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर २०२३ रोजी कामगार संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष संदीप शिंदे यांनी सहकार आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार, यवतमाळमध्ये सदावर्ते पॅनलच्या संचालकांनी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. या सभेपूर्वी सर्व सभासदांना अहवालाचे वाटप करण्यात आलं नव्हतं. एवढंच नाही तर त्यावर नथुराम गोडसेचे फोटो छापण्यात आले होते. एसटी कामगारांचा राजकारणाशी काहीही संबंध नसताना गोडसेचे फोटो छापणं योग्य नाही अशी तक्रार एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी सहकार आयुक्तांकडे केली होती.

वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे पूर्वी सर्व सभासदांना १४ दिवस आधी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना देणे आवश्यक होते. परंतु अशा कुठल्याही सूचना या संचालक मंडळाकडून देण्यात आल्या नव्हत्या. आपल्या मर्जीतील सभासद बोलवून, हवे त्या विषयांना मंजुरी मिळवून घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला. मुख्य म्हणजे पोटनियम बदलाची सुचना सभासदांना देणे बंधनकारक होते.या ठिकाणी बँकेचे तज्ञ संचालक म्हणून सदावर्ते पती-पत्नींची निवड बेकायदेशीर रित्या करण्याचा ठराव आणला. तो ठरावही सहकार खात्याने रद्द केल्यामुळे आता यापुढे सदावर्ते पती-पत्नी स्वीकृत संचालक म्हणून राहणार नाहीत. बँकेचे अध्यक्ष उपाध्यक्ष हे निर्वाचित संचालकांमधून असावेत असेही प्रकारचा ठराव त्यांनी बेकायदेशीररित्या केला होता. या ठरावाला सहकार खात्याने नामंजूर केले आहे. दरम्यान, अशी कोणतीही कारवाई आपल्यावर करण्यात आली नसल्याचा दावा गुणरत्न सदावर्तेंनी केला आहे.